महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांकः०२४७२ २२७३०१ Email — rdc1osmanabad@gmail.com फॅक्स क्रमांकः ०२४७२ २२८०१८

जा.क्र.२०२०/उपचिटणीस/एमएजी/सीआर- २६ दि.२३/०३/२०२०

अत्यंत तातडीचे / आपत्ती व्यवस्थापन प्राधान्य/ इमेलव्दारे

**// आदेश //**

**विषयः- करोना विषाणू (कोव्हडी १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे बाबत. दिनांक २३.०३.२०२० ते ३१.०३.२०२० या कालावधीत जिल्ह्यातील सिमा बंद करण्याबाबत.**

संदर्भः- १. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसुचना क्रं. करोना २०२०/ प्र.क्र. ५८/आरोग्य-५, दि. १३ मार्च, २०२०.

२. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसुचना क्रं. करोना २०२०/ प्र.क्र. ५८/आरोग्य-५, दि. १४ मार्च, २०२०.

३. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रं. करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५, दि. १४ मार्च, २०२०.

४. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रं. करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५, दि. १४ मार्च, २०२०

ज्याअर्थी राज्य शासनाने करोना विषाणू (कोव्हीड-१९) या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्यान्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात (कोव्हीड-१९) नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. तथापी माझ्या असे निदर्शनास आले आहे की, उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरीक बाहेर जिल्ह्यात प्रवास करीत आहेत. तसेच बाहेर जिल्ह्यातील नागरीकही उस्मानाबाद जिल्ह्यात येत आहेत. बाहेर जिल्ह्यातून येणारे नागरीक, प्रवासी यांचेमार्फत करोना विषाणू (कोव्हीड-१९) संसर्ग व प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता जिल्ह्यातील जनतेच्या आरोग्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने तात्काळ प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी, दिपा मुधोळ —मुंडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद जिल्ह्यात करोना विषाणूचा (कोव्हीड-१९) जिल्ह्यात संसर्ग व प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांमध्ये करोना विषाणूचा जिल्ह्यात संसर्ग व प्रादुर्भाव टाळण्यासाठी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

१. उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व सिमा तात्काळ बंद करण्यात येत आहेत.

२. जिल्ह्यातील कोणत्याही नागरीकास अत्यावश्यक कारण वगळता बाहेर जिल्ह्यात जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

३. जिल्ह्यातील नागरीक नसलेल्या कोणत्याही व्यक्तीस जिल्ह्यात अत्यावश्यक कारणाशिवाय प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

४. पुणे- मुंबई व इतर महानगरातून जिल्ह्यात आलेल्या व्यक्तींना वैद्यकिय कारणाशिवाय घराबाहेर पडण्यारा मनाई करीत आहे.

वरील आदेश शासकीय कर्तव्यावरील अधिकारी/ कर्मचारी व अत्यावश्यक सेवा यांचेसाठी लागू राहणार नाहीत.

सदरील आदेश दि. २३.०३.२०२० ते ३१.०३.२०२० पर्यंत अंमलात राहतील. आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समूह यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये आणि भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानन्यात येईल व कार्यवाही करण्यात येईल.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे

स्वाक्षरीत /-
(दिपा मुधोळ -मुंडे)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण उस्मानाबाद

**प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादरः-**

१. मा. संचालक आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय, मुंबई — ३२
२. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तवः-**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद
२. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद
३. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद
४. अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद
५. जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद
६. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद
७. सहायक आयुक्त, समाज कल्याण,विभाग, उस्मानाबाद
८. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद
९. जिल्हा क्रिडा अधिकारी, उस्मानाबाद
१०. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि.का. उस्मानाबाद
११. उपविभागीय अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद
१२. तहसिलदार सर्व जिल्हा उस्मानाबाद
१३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रा. प. / सा.प्र./ एकात्मिक बालविकास/ स्वच्छता व पाणीपुरवठा जि. प. उस्मानाबाद
१४. शिक्षणाधिकारी प्राथिमक व माध्यमिक जि. प. उस्मानाबाद
१५. गट विकास अधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१६. मुख्याधिकारी नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद
१७. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, व्दारा शासकीय तांत्रिक विद्यालय, तळमजला उस्मानाबाद

DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

23/3/20
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण उस्मानाबाद
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

Scanned by CamScanner